दि. ०९/१०/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

खाजगी ईसम :- १) श्री. अशोक राजाराम वाघमोडे, गृपग्रामपंचायत केळगाव (सरपंच यांचे पती ई.लो.से. २) श्री. बबन रामसिंग चव्हाण, उप सरपंच, गृप ग्रामपंचायत, केळगाव ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये १,००,०००/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण, ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | १) खाजगी ईसम श्री. अशोक राजाराम वाघमोडे, गृपग्रामपंचायत केळगाव- (सरपंच यांचे पती )<br>२) श्री. बबन रामसिंग चव्हाण, उप सरपंच, गृप ग्रामपंचायत, केळगाव ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | ३,००,०००/- रुपये. तडजोडीअंती- २,००,०००/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | तडजोडीअंती १,००,०००/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्री. राहुल फुला, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना गृपग्रामपंचायत केळगाव येथे लिपीक पदावर कायम ठेवण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांना वसुली कारकुन म्हणुन कामावर ठेवणे बाबत गृपग्रामपंचायत केळगाव यांनी ठराव केला व त्यानंतर सहा महिने उपरान्त त्यांना कायम करतांना खाजगी ईसम १) वाघमोडे ई.लो.से.२) चव्हाण यांनी ५०,०००/- रुपये घेतले. तदनंतर पंचायत समिती मार्फत तक्रारदार यांना कायम होवून पगार सुरु झाले तेव्हा ग्रामपचांयत मध्ये लिपीक व वसुली कारकून यांचेपैकी एकच पद भरता येणार होते. असे खाजगी ईसम वाघमोडे (सरपंच पती) व ई.लो.से. श्री.चव्हाण, उप सरपंच यांना माहित झाल्याने त्या दोघांनी मिळून तक्रारदार यास आम्हास लिपीक पदासाठी एकाने तीन लाख रुपये दिले आहे, तेंव्हा तू आम्हास तीन लाख रुपये दे नाहीतर आम्ही पुन्हा तुझ्या विरुध्द ठराव घेवुन तुला काढून त्या ऐवजी लिपीक म्हणुन त्यास भरती करु असे म्हणुन ३,००,०००/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 09/08/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता खाजगी ईसम 1) वाघमोडे ई.लो.से 2). चव्हाण यांनी तडजोडीअंती 1,00,000/- रुपये मागणी करुन पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून धरणाजवळ असलेल्या पाणीपुरवठा विहीरी जवळ आधारवाडी ता.सिल्लोड जि.औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. सिल्लोड ग्रामीण औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, राहुल फुला यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं. राजेंद्र सिनकर, रविंद्र काळे, शिरीष वाघ, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लिकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद.